# समाजस्वास्थ्य

संपादक
र. धों. कर्वे, एम. ए.

वर्ष २४, अंक ८ वा | १५ फेब्रुवारी १९५१ | किंमत ४ आणे



# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | स्वतंत्र आचरणाचे नियम–३ ... ... | १६९ |
| २ | नेपाळ बाबाची करामत ... ... ... | १७४ |
| ३. | कामक्षेत्रांतील दोन भिकारणी ... ... | १७६ |
| ४. | संततिनियमनाची अेक सोपी पद्धत ... | १७८ |
| ५. | ग्रंथपरीक्षण ... ... ... ... | १८० |
| ६. | पत्रव्यवहार ... ... ... ... | १८३ |
| ७. | शारदेचें पत्र ... ... ... ... | १८८ |



## अेजंटांचीं नांवें

**मुंबई** : श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

**पुणें** : अेल्. के. जोशी, बुकसेलर.
डी. अेच्. शहा, बुकसेलर.

**कोल्हापूर** : दासराम बुक डेपो

**बेळगांव** : डी. अेम्. पटेल,
२८७२ खडे बाजार.

**अहमदनगर** : पी. जी. बापट,
बुकसेलर, नवी पेठ

**निपाणी** : के. एस्. बळगुर्गी

**कुमठा** : आर् एम्. कामत

**गोकाक** : पी. एम्. शिरगांवकर

**बारामती** : मोहन बुक डेपो

**सावंतवाडी** : वि. के. वाडकर

**श्रीरामपूर** : के. बी. सोनार.



**वार्षिक वर्गणी** रु. ३, व्ही. पी. ने सवातीन

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# स्वतंत्र आचरणाचे नियम-३

आधुनिक तज्ञांच्या मताने स्वसंभोगासंबंधीं जुन्या कल्पनांना आतां मूठमाती देण्याची वेळ आली आहे, हें ऐकून पुष्कळांना-नव्हे तज्ञांचे मतें जवळजवळ सर्वांनांच-बरें वाटेल. या प्रकारापासून अलिप्त राहिलेले लोक फारच थोडे असतात असें तज्ञांचें मत आहे, तेव्हां कामस्वातंत्र्याच्या दृष्टीने या प्रश्नाचा फेरविचार करणें भाग आहे.

क्लीबनीतीच्या पुरस्कर्त्यांना अशी भीति वाटते-निदान ते असें म्हणतात-की दुसऱ्याचें नुकसान होत नाही तोंपर्यंत पाहिजे त्या रीतीनें आपलें समाधान करून घेण्याचा प्रत्येकाला हक्क आहे अशी घोषणा केल्यास मग स्वसंभोगांत कांहींच वाईट नाही असें समजून त्याचा तरुणांकडून अतिरेक होण्याचा संभव नाही काय ?

पण ही भीति अज्ञानमूलक आहे. शेंकडा ९९ तरुणांना कांही प्रमाणांत ही संवय असते हें लक्षांत घेतल्यास ती जास्त पसरण्याची शक्यता कोठे राहिली ? क्लीबनीतीने या संवयीला आळा घातलेला नाही, यावरून ती नैतिक विचारावर अवलंबून नाही हें उघड होतें. ती किती प्रमाणांत असेल हें सर्वस्वी ज्याच्या त्याच्या कामवासनेच्या कमीअधिक प्रमाणावर अवलंबून असतें. क्लीबनीतीचा परिणाम इतकाच होतो की या संवयीला चोरट्या सुखाच्या आकर्षणाने आणखी उत्तेजन मिळतें. तो प्रत्येकाचा हक्क

आहे असें म्हटल्याने हें आकर्षण नाहीसें होईल आणि या संवयींत धोका कोणता आहे याची समंजसपणें चर्चा झाल्याने तो सर्वांच्या मनांत अधिक बिंबेल. हा तुमचा हक्क आहे, मात्र अतिरेक झाल्यास प्रकृतीला धोका आहे, असें सांगितल्यास प्रकृतीला मनुष्य आपोआपच जपूं लागतो. अर्थात् ज्याप्रमाणें कित्येकांना दारूचें किंवा जुगाराचें व्यसन लागतें आणि मर्यादा संभाळतां येत नाही, त्याचप्रमाणें कित्येकांना याही बाबतींत मर्यादा ठेवतां येणार नाही. पण त्यांच्यावर निर्बंधांचाही परिणाम होणें शक्य नसतें, तेव्हां हा स्वातंत्र्याचा वाईट परिणाम म्हणतां येणार नाही. पण कित्येक लोक फाजील खाऊन किंवा कित्येक झिंगून आपला नाश करून घेतात, म्हणून सर्वांवर अन्नाचे किंवा मद्याचे बाबतींतही निर्बंध घालून व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड येणें, अपवादात्मक लोकांना वांचवण्याकरतां सर्वांवर बंधन घालणें, हा अक्षम्य जुलूम आहे. अशा लोकांची प्रकृतिच अतिरेकी असते. ज्यांना स्वतःवर बंधन घालतां येत नाहीं, त्यांना वांचवणें कयद्यालाही शक्य होत नाहीं. कायद्याने तुरुंगाची भीति घातली, किंवा धर्मानें त्याहीपेक्षां भयंकर नरकाची भीति घातली, तरी असे लोक अतिरेक करायचे थांबत नाहीत. मग त्यांना वांचवण्याचा व्यर्थ खटाटोप करण्यांत काय फायदा?

स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते स्वसंभोगांत नीतीचा कांही संबंध मानीत नाहीत, कारण त्याने दुसऱ्याचें नुकसान होत नाही. अितकेंच नव्हे तर अतिरेक न केल्यास त्यांत कोणाचेंच नुकसान नाही. अतिरेक वाईट अितकेंच ते सांगतात, पण मर्यादेंत राहिल्यास त्यांत कोणतेंही नुकसान नाही हेंही ते सांगतात. ज्यांना स्त्रीपुरुषांच्या समागमापेक्षां स्वसंभोगच जास्त पसंत असतो, असे बरेच लोक असतात आणि त्यांची ही संवय जन्मभर सुटत नाही आणि तरी ते निरोगी राहतात. अितकेंच नव्हे तर तारुण्यांत केलेल्या थोड्याबहुत अतिरेकाचे परिणाम कायम टिकत नाहीत, कालांतराने ते नाहीसे होतात.

कामेंद्रियांचा पापाशीं संबंध जोडणाऱ्या नीतिबाज लोकांनी स्वसंभोगाविरुद्ध प्रचाराच्या बाबतींत अितका अतिरेक केला आहे की स्वसंभोग

करणारीं मुलें लवकर मरतात, किंवा त्यांना वेड लागतें, अशीं विधानें ते बेलाशक ठोकून देतात. त्यांना या सत्कृत्याच्या भरांत खऱ्याखोट्याची बिलकुल पर्वा रहात नाही. जे फक्त शरीराच्या गरजेच्या मानाने स्वसंभोग मर्यादित करतात, त्यांच्यावर तर कोणताही वाईट परिणाम होत नाही नेहमी स्वसंभोग करणोर अविवाहित पुरुष अत्यंत वृद्ध झाले तरीही त्यांचें शारीरिक व मानसिक आरोग्य बिघडत नाही, असा डाक्तरांचा अनुभव आहे. अितकेंच नव्हे तर जो मुलगा कधीही स्वसंभोग करीत नाही, त्याच्या वाढींत कांहीतरी कमतरता असली पाहिजे, असेंही पुष्कळ डाक्तर मानतात. स्वसंभोगाविरुद्ध प्रचारकांचे आरोप हास्यास्पद आहेत, असें कित्येक आधुनिक डाक्तरांनी लिहिलं आहे.

या विरोधकांचें असेंही म्हणणें असतें की समागमापेक्षां स्वसंभोगाने शरीरावर अधिक ताण पडतो आणि त्यांत दुसऱ्याची मदत लागत नसल्यामुळें अतिरेकाचा संभव जास्त असतो. यांत थोडेंबहुत तथ्य असलें तरीदेखील क्लीबनीतिवाल्यांचा विरोध त्यावर अवलंबून असतो असें नाही, ते आपल्या विरोधाला पोषक कारणें शोधीत असतात अितकेंच. याउलट डाक्तरांना असे पुष्कळ लोक माहीत असतात ते की स्वसंभोगाला फार लवकर सुरवात करून हाच प्रकार जन्मभर चालू ठेवतात आणि तरीदेखील त्यांचें कोणतेंही नुकसान झालेलें दिसत नाही. त्यापैकी कांहीजण त्यांतही दुसऱ्याची मदत घेतात, किंवा मधून मधून समागमही करतात, पण मुख्यतः स्वसंभोगावरच भर देतात आणि हे लोक पुष्कळ वेळां म्हातारे होऊन मरतात. स्वसंभोगाची संवय अितकी पसरलेली आहे की प्रॉटेस्टंट पंथाच्या अेका लेखकाने संततिनियमनाच्या दृष्टीने असें लिहिलें आहे की विवाहित जोडप्यांना अेकमेमकांचें समाधान करण्याकरतां समागमच करावा लागतो असें नाही, त्याशिवाय अन्य मार्गांनीही अेकमेकांचें समाधान करतां येतें आणि अशा रीतीने गर्भधारणेचा धोका टाळतां येतो.

सर्व समाजशास्त्रज्ञांना या संवयीचें अस्तित्व गृहीतच धरून चालावें लागतें. वास्तविक पाहतां या संवयींपासून कित्येकांचें जें नुकसान होतेंसें

दिसतें, तें या संवयीमुळें होत नसून क्लीबनीतिवाल्यांच्या खोटया प्रचारामुळें होत असतें. अेरवीं फारच अतिरेक केल्याशिवाय कोणतेंही नुकसान होत नाही, याबद्दल धर्मानें न पछाडलेल्या कोणत्याही आधुनिक डाक्तराला शंका नाही. अेका फ्रेंच लेखकाने स्वतःचा अनुभव दिला आहे की तेराव्या वर्षापासून चोविसाव्या वर्षापर्यंत स्वसंभोगाचा अतिरेक करूनही त्याचें कोणतेंहा नुकसान झालें नाही. प्रथमतः स्त्रीसमागमाचा प्रसंग आला तेव्हां लज्जेमुळें त्याला यश आलें नाही, पण हें प्रासंगिक नपुंसकत्व देखील लवकरच नाहीसें झालें. मात्र त्याची स्वसंभोगाची आवड कायम राहिली.

१९२९ सालीं भरलेल्या कामविषयक सुधारणापरिषदेपुढें मिसेस डेंट नांवाच्या बाअीने सांगितलें की आअीबाप, पालक आणि शिक्षक हे स्वसंभोग करणाऱ्या मुलांना नेहमी रोगांची, वेडाची व मृत्यूचीही भीति घालीत असतात, पण हें केवळ त्यांचें अज्ञान आहे. सामान्यतः निरोगी मुलें या बाबतींत अतिरेक करीत नाहीत आणि अेखाद्याचा स्वसंभोगाकडे जास्त कल आहे असें दिसलें तरी त्याचा अर्थ अितकाच असतो की त्याच्या प्रकृतीच्या मानाने त्याची त्याला अितरांचे मानाने जास्त जरूर असते. कांही झालें तरी या संवयीबद्दल कधींही मुलांना शिक्षा करतां कामा नये. तें पाप नाही, गुन्हा नाही, त्यापासून सामान्यतः नुकसान होत नाही.

ज्यांना ही संवय नाही, किंवा ज्यांना स्वसंभोगाची अिच्छा होत नाही, अशीं शेंकडा पांच मुलें सांपडणार नाहीत. अशा स्थितींत आअीबापांनी मुलांची ही संवय मोडण्याकरतां डाक्तरांकडे धांव घ्यावी हा मूर्खपणा नव्हे काय? या बाबतींत मुलांत आणि मुलींत फरक नाही. ही नैसर्गिक गोष्ट आहे, तिला रोग समजून भलभलते उपाय करणें म्हणजे निसर्गाविरुद्ध उपचार करणें होय. हा केवळ धार्मिक मूर्खपणा आहे.

सारांश शरीरशास्त्राच्या दृष्टीने पाहतां कामजागृति झाल्याबरोबर मुलांनी स्वसंभोगाने स्वतःचें समाधान करून घेणें हें नैसर्गिक आहे. सामाजिक

कारणांनी स्त्रीपुरुषसमागम अशा वयांत अशक्य असतो आणि तो शक्य होओीपर्यंत ही संवय सामान्यतः चालू राहते व कित्येक वेळां नंतरही राहते. ही संवय ज्यांना नाही अशीं मुलें अपवाद समजलीं पाहिजेत. अजीर्ण होओी-पर्यंत खाणारीं माणसें जशीं अपवादात्मक असतात, तशींच या बाबतींतही अतिरेक करणारीं मुलें अपवादच होत. या संवयीमुळें ज्यांना समागम नकोसा वाटतो, तींही अपवादच. पण ही संवय बरींच वर्षें चालू राहिल्यावर समागम शक्य झाला तरीही पुष्कळांची संवय जन्मभर राहते व तीं दोन्ही मार्गांनी आपलें समाधान करून घेतात.

तेव्हां याबद्दल फेरविचार केल्याचा निष्कर्ष असा निघतो की ही संवय नैसर्गिक आहे, तींन पाप नाही, गुन्हा नाही, व तीपासून सामान्यतः कोण-तेंही नुकसान होत नाही. अतिरेकाने नुकसान होतें, पण अतिरेक करणारे अपवादच होत.

अतिरेक केव्हां म्हणावा हाही विचार केला पाहिजे, पण याचें निश्चित उत्तर शक्य नाही, कारण तें ज्याच्या त्याच्या प्रकृतीवर अवलंबून असतें. अेका डाक्तराने लिहिलें आहे की कित्येक मुली दिवसांतून तीनदां पासून दहा वेळां स्वसंभोग करतात. हा अतिरेक आहे. मुलांना असा अतिरेक शक्यच नसतो, कारण अितक्या वेळां उत्थापन होणार नाही. पण वाढीच्या वयांत दररोज अेकदांपेक्षां जास्त वेळां स्वसंभोग केल्यास तो सामान्यतः अतिरेक समजावा. कित्येक मुलांनी खाजगी रीतीने सांगितलें की दररोज अेकदां हा नियम, पण अेखादे वेळीं फाजील उद्दीपन होण्यासारखें कांही कारण झाल्यास दिवसांतून दोनतीनवेळां स्वसंभोग होतो. तेव्हां अेवढ्याने सामान्यतः नुकसान होत नाही असें दिसतें. अर्थात् ज्यांची प्रकृति मूळचीच चांगली नसेल, त्यांचें अेवढ्यानेही नुकसान होओील. पण अतिरेक करणारे फारच थोडे असतात असा अनुभव आहे, तेव्हां स्वसंभोगाचा क्लीबनीतिवाल्यांनी नसता बाऊ केला आहे असाच निष्कर्ष निघतो.

---

# नेपाळ बाबाची करामत

अंगुल येथें खरोखर काय झालें, हें विश्वसनीय रीतीने आम्हाला कळलें नव्हतें आणि कित्येक पत्रेंही नेपाळबाबाचा गौरव करीत होतीं, परंतु या बालयोग्याचें बिंग बाहेर पडण्यापूर्वीच लिहिलेला यासंबंधीचा अेक लेख वर्धा येथील 'संगम' मासिकांत आला आहे, त्याचा सारांश येथें देतों.

'अंगुल येथें जो प्रकार चालला आहे, तो केव्हांतरी बाहेर फुटेलच, पण त्याचबरोबर हेंही जाहीर होअील की आमचा देश दुष्ट आणि मूर्ख लोकांनी कसा भरलेला आहे. जे या फसवणुकींत सामील होते ते दुष्ट, आणि कित्येक अिशारे मिळाले असतांही जे त्यांच्या दुष्टपणाला बळी पडले, ते मूर्ख.

'अंगुल येथील अेक धनगराचा पोर कांही मुळ्या देतो आणि त्यांनी सर्व रोग बरे होतात, अशी अफवा उठून तो मनुष्य अेकदम बालयोगीच नव्हे तर देव बनला. देव आणि योगी बनवण्याचा कारखानाच या देशांत आहे आणि यामुळें ते अतिशय स्वस्त झाले आहेत. अेखाद्या मुलाला अेखादी उपयुक्त मुळी सांपडली, तरी त्यामुळें तो योगी किंवा भगवान कसा होतो, हें समजणें कठिण आहे. दुसरी गोष्ट अशी की त्याची जडीबुटी म्हणजे कांही सामान्य झाडांच्या साली कुटून तयार केलेली आहे. तिने कोणी बरा झाला नाही आणि होणें शक्यही नाही, ही गोष्ट आतां सिद्ध झाली आहे.

'तरीपण हा प्रकार दिवसेंदिवस वाढतच जात आहे. याकरतां मुद्दाम तयार केलेले साक्षीदार असें सांगत आहेत 'मी मुका होतों, पण आतां बोलूं लागलों, माझ्या अंगावरचें कोड नाहीसें झालें, वगैरे,' आणि अशा बातम्या देशभर पसरत आहेत. यांत अनेक लोकांचा स्वार्थ आहे. कदाचित् सर्वांत जास्त मिळकत दररोज पांचपांचशें रुपये मिळवणाऱ्या मोटरवाल्यांची असेल. कित्येक लोक या बालयोग्याच्या नांवावर मोठा व्यापार करीत आहेत आणि

कित्येक लेखक आणि कवि त्याची भरमसाट स्तुति करून पोट भरीत आहेत. कित्येक पत्रकारांनीही हाच धंदा चालवला आहे. याने कदाचित् त्यांचीं पत्रें अधिक खपत असतील, किंवा त्यांना कांही लांचही मिळत असेल. यामुळें देशाचें किती नुकसान होतें याची त्यांना काय पर्वा ?

' कित्येक रोगांनी पीडलेले लोक तेथें जाऊन शेंकडों रुपये खर्च करून नवे रोग विकत घेऊन आले, पण ते आपली फजीती सांगतील कसे ? तेव्हां आपण अेकटेच नकटे राहूं नये, आपल्यासारखेच आणखीही कांही असावे, म्हणजे लाजण्याचें कारण राहणार नाही, अशा हेतूने आपल्याला चांगलाच फायदा झाला असें ते सांगत असावे. पण ही फजीती अितकी उघड होती की ती लपण्यासारखी नव्हती. हा प्रकार शक्य तितके दिवस चालू ठेवून त्यांतून शक्य तितका फायदा काढण्याची कित्येकांची खटपट चालूच राहिली आणि ते थापांवर थापा देत राहिले.

' अेक थाप अशी की ज्यांची श्रद्धा असेल त्यांनाच फायदा होतो, ज्यांना फायदा झाला नाही त्यांची श्रद्धाच नव्हती, तर त्यांना फायदा कसा होणार ? असें अजब तर्कशास्त्र ते सांगत होते. तो धनगर बिचारा वनस्पति कुटून देत होता, पण उद्यां अेखादा गाढवाची लीद देऊन सांगूं लागला की ज्याची श्रद्धा असेल त्याला गुण येअील, नसेल त्याला येणार नाही, तरी मूर्ख लोक फसतील आणि अशा रीतीने जगांतील कोणतीही वस्तु दिव्य औषधि ठरेल आणि घरोघर योगी उत्पन्न होतील आणि ज्या गाढवाची लीद घेतली असेल त्यालाही अशीच कांही पदवी द्यावी लागेल.

' दुसरी अेक थाप ही की गुण यायला अेकवीस दिवस लागतात. अेकवीस दिवसांतच कोणी मरणार नाही आणि नंतर तो घरीं जाऊन मेला तरी काय हरकत आहे ? अशा रीतीने कित्येक लोक मेलेही आहेत, पण ज्या हरामखोरांनी ही शक्कल काढली, ते म्हणतात की ते लोक पापी होते, तेव्हां त्यांना कसा गुण येणार ? अीश्वराच्या कृपेने ते लवकर वैकुंठास गेले हा काय

थोडा फायदा झाला?'

नंतरची हकीकत वाचकांस माहीतच असेल की सरकारने अेक समिति नेमून चौकशीअंतीं जाहीर केलें की ही सर्व फसवणूक आहे, या औषधाने कोणाला गुण आल्याचा बिलकुल पुरावा नाही. तेथें जाणारांपैकी शेंकडों लोक पटकीने मेले आणि शेवटीं तिकडे जाणाऱ्या गाड्यांनाही बंदी करणें सरकारला भाग पडलें. यांत याच्या मुळाशीं असलेल्या हरामखोरांचा दुष्टपणा जितका दिसतो, तितकाच जनतेचा मूर्खपणाही दिसतो. हा अंधश्रद्धेचा परिणाम आहे. श्रद्धेला पुराव्याची गरज नसते अेरवीं अितके धर्म कसे फैलावले असते?

---

# कामक्षेत्रांतील दोन भिकारणी

लेखक, वि. वि. लिमये, पंढरपूर.

दोघींनाही त्या क्षेत्रांत जन्मभर वावरून वृद्धावस्थेमुळें त्याचा त्याग करणें भाग पडलें. द्रव्यसंग्रह करतां आला नाही, अखेर भिक्षापात्र अवलंबून देशोधडीस लागलेल्या दोन भिकारणी आमच्या पंढरी क्षेत्रांत पाहिल्या. त्यांना पाहून काय वाटलें?

अ. अतिशय उंची किंमतीचा तंबोरा, पण मालकिणीबरोबर वृद्धापकालाची छटा त्यावर आलेली असूनही तो आपल्या मालकिणीला साथ देत होता. सुरेल आवाज आणि कलाभिज्ञ म्हणण्याची पद्धत, अशा रीतीने भक्तिरसपूर्ण कबीर, सूरदासादि संतकवींच्या पदांचें गायन करीत, जरूरीपुरतीच गांवातून फेरी करायची, हा तिचा कार्यक्रम. अेखाद्या चित्रपटांत नारदाची स्वारी गायन करीत दुरून येतांना होणारा भास तिच्या गायनाने होअी आणि तिकडे लक्ष गेल्याशिवाय रहात नसे. तिला पहावें तों अगदी साधारण रूप, मध्यम

देहयष्टि, पश्चात्तापी नजर, हें सर्व पाहिल्यावर वाटे, हिचें सर्व तारुण्य गायकी व्यवसायांत आणि वेश्यावृत्तींत गेलें असलें, तरी तो उपजत स्वभाव नसावा. तिचेवर परिस्थितीने तो प्रसंग आला असावा. त्या प्रसंगांत सुद्धां वागण्याच्या अनेक तऱ्हा आहेत. गिऱ्हाअिकांच्या प्रपंचाची धूळधाण उडवायची, द्रव्य शोषण करायचें आणि मन मानेल तसें वागायचें, असें न करतां गायनवादन, विलास, सौख्य-समाधान दाखवून, निकटवर्तीयांनाही सुखी करून, आपली चिरकाल स्मृति राहील असाच तिचा आयुष्यक्रम भूतकाळीं असला पाहिजे, असें विचारी मनाला खात्रीने वाटावें.

कांही दिवस वास्तव्य झाल्यावर ती सहज अेक दिवस आमच्या उत्तर भागांत आली. तिने दोनचार भजनी पदें म्हटलीं आणि मिळालेल्या अल्प मोबदल्यावर समाधान मानून निघाली. मीं विचारलें, प्रत्येक अेकादशीला फावल्यावेळीं मुद्दाम हेलपाटा घ्याल का ? ती दर अेकादशीला मुद्दाम यायची, तिच्या व आमच्या सवडीप्रमाणें कांही भजनी पदें व्हायचीं व ती निघून जायची मी जो अल्प मोबदला देअीं, तो ती समाधानाने स्वीकारून चालूं लागे. अेकदां मी रिकामा होतों, सहज विचारलें, बाअी, तुम्ही मूळच्या कुठल्या ? आपल्याजवळ असा गायनाचा उत्तम गुण असून ही दशा कां आली ? ती म्हणाली, बाळ, तुमच्या ध्यानांत आलंच असेल. मला कशाला विचारतां ? आतां पांडुरंगाचे पायीं शेवट झाला म्हणजे मिळवलें. पुढें थोडयाच दिवसांनी ती दिसेनाशी झाली.

**आ.** दुपारची १२-१२॥ ची वेळ. दार लोटून, जेवणानंतरचे वाचनाचे कागद हातीं घेऊन आरामांत असतां अेकदम कर्णकटु 'माधुकरी आअीसाहेब !' अशी खडखडीत आवाजांत मागणी आली. तिला माधुकरी मिळाली. माझी येऊं लागलेली गुंगी ताडकन् उडाली. विकृत नव्हे, पण काळ्या, कुरूप. चेहऱ्याचें विजयी हास्य नजरेस पडलें, वाचनावरील लक्ष उडालें आणि त्या व्यक्तीबद्दलच विचार सुरू झाले.

अेखाद्या अिस्पितळांतील नर्सप्रमाणें अत्यंत पांढऱ्या शुभ्र वस्त्राने संपूर्ण हात झांकले जातील असा बंडीवजा अंगरखा, आणि तसेंच भरपूर लांबी-रुंदीचें नवेंच पातळ, कणखर, कष्ट, मार, वगैरे सोसून बनलेली देहयष्टि, भेदक, शोधक व चंचल नजर, विवक्षित चाल, आणि मधूनच मागें पाहण्याची तऱ्हा, हें सर्व पाहिल्यावर भिक्षेकऱ्याबद्दल वाटणारी दया, सहानुभूति वगैरे नष्ट होऊन साधारण तिरस्कार उत्पन्न होणें शक्य वाटे. तिचा अधून-मधून दिसणारा कार्यक्रम पाहिल्यावर तिचें पूर्वायुष्य भांडणें, कटकटी, शिवी-गाळी, उचमपचम, आणि सामान्यतः समाज जे प्रकार निंद्य मानतो ते सर्व, यांत गेलें असावें. तिने भावनाशून्य तऱ्हेने अनेकांची फक्त शारीरिक भूक भागवली असावी, किंवा तेंही न करतां द्रव्यहरण करून कित्येकांना धक्के दिले असावे. तिला समाधानाने कोणी भिक्षा घालीत नसावें. ज्ञातिवाल्यांनी मठांत ठेवली, पण लवकरच दुर्गुणांमुळें हकालपट्टी झाली. आतां अेका पडक्या मठांत ठाणें आहे. अितर हलक्या दर्जाचे लोकही तेथें असतात. पोषाख मात्र जसाच्या तसाच असतो कसा, हा प्रश्न आहे. की समाजांत पूर्वायुष्याचे चाळे चालतात? कोण जाणे. असल्या या बाअीस वरील बाअीप्रमाणेंच प्रश्न विचा-रला असता, तर शिव्या खाण्याचाच प्रसंग यायचा !

---

# संततिनियमनाची अेक सोपी पद्धत

हल्ली सरकारच्या आडमुठेपणामुळें अर्धगोलाकृति टोपी (डच कॅप किंवा डायफ्राम् पेसरी) बाजारांत दुर्मिळ झाली आहे. अशा वेळीं शकुंतलाबाअी पराजपे यांनी पुरस्कारलेली पुढील पद्धत पुष्कळांना उपयोगी वाटेल. ती डच कॅपच्या अितकीच यशस्वी आहे, असें शकुंतलाबाअींनी अनेकांच्या अनुभवा-वरून मत दिलें आहे. हाच उपाय मारी स्टोप्स यांनीही आपल्या पुस्तकांत

सांगितलेला आहे.

अेखाद्या जुन्या धोतराची किंवा पातळाची तीन अिंच रुंद व अेक फूट लांब अशी चिंधी फाडावी. तें जुनें असेल तितकें मऊ असतें, परंतु स्वच्छ मात्र असावें. या चिंधीच्या चारी कडा आंत मुडपाव्या, म्हणजे अेकही सुटा धागा बाहेर राहूं देऊं नये. नंतर तिची सुमारें १॥×१॥ अिंच मापाची चौकोनी घडी करावी. या घडीचीं तोंडें उलगडूं नयेत म्हणून शिवून टाकावीं. शिवण्याचा दोरा मजबूत पण मऊ असावा व शिवल्यानंतर दीड वीत लोंबत राहूं द्यावा. नंतर फिरकीचें झांकण असलेल्या अेका स्वच्छ बाटलींत पावशेर स्वच्छ खोबरेल किंवा गोडें तेल घालून त्यांत दोन चमचे म्हैसुरी चंदनाचें तेल टाकावें. टाटाच्या केसांच्या तेलाची बाटली घेऊन त्यांतील दोन चमचे तेल काढून त्याअैवजीं चंदनाचें तेल घातल्यास सोयीचें होअील. वर सांगितलेली घडी या मिश्र तेलांत दोन्ही बाजूंनी ओली करावी ( चबचबीत भिजवण्याचें कारण नाही ) व समागमाचे अगोदर अेक तास गर्भाशयाचे फुलावर बसवावी व दोरा बाहेर लोंबतच ठेवावा. समागमानंतर सात तासांनी दोरा ओढून घडी बाहेर काढून फेकून द्यावी. संडास फ्लशचा असल्यास त्यांत टाकूं नये, कारण संडास तुंबेल. जरूरीप्रमाणें या घडीचा चौकोन लहान मोठा करतां येअील. तेलांत भिजवलेली घडी अेक तास अगोदर बसवल्यामुळें तेलाला गर्भाशयाचे तोंडावर पडदा करण्यास वेळ मिळतो व नंतर रेतजंतु आंत जाऊं शकत नाहींत. शिवाय चंदनाचें तेल जंतुनाशकही असल्यामुळें त्यांचा नाश होतो. याशिवाय पुरुषानेही आपल्या अिंद्रियाच्या तोंडावर हेंच तेल किंवा जंतुनाशक जेली लावल्यास हा उपाय अधिक यशस्वी होअील. कांहीं स्त्रियांना डच कॅप बसवणें कठिण किंवा अशक्य होतें, कारण गर्भाशय कललेला असतो. अशा वेळींही ही घडी बसवतां येअील.

---

# ग्रंथपरीक्षण

**१ चिडियाघर,** लेखक, भानू शिरधनकर. प्रकाशक, अभिनव प्रकाशन, मुंबई–१४, पृ. १६३, किंमत तीन रु.

चिडिया या शब्दाचा अर्थ पक्षी असा आहे आणि पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणाचा मथळा 'चिडियाघर' असा आहे. तथापि या पुस्तकांत अनेक पशुपक्ष्यांच्या जीवनाविषयीं अत्यंत मनोरंजक माहिती दिली आहे. यांतील बहुतेक लेख किर्लोस्कर मासिकांत प्रसिद्ध झालेले आहेत आणि सर्व लेख त्या त्या विषयांतील तज्ञांच्या मुलाखती आहेत. आरंभीं लेखांचा फक्त अनुक्रम दिला आहे, पण पृष्ठें दिलीं नाहीत, हें वैगुण्य आहे. पहिली मुलाखत राणीच्या बागेचे माजी व्यवस्थापक श्री. वेदक यांची आहे. तींत 'अलसेटिअन' कुत्र्याचा उल्लेख आहे. हा उच्चार चुकीचा आहे. अलसेशिआ हें अेका प्रांताचें नांव आहे, त्यावरून तेथील कुत्र्यांना अलसेशिअन म्हणतात, अलसेटिअन नव्हे. श्री. वेदकांना हा उच्चार माहीत असायला पाहिजे होता. पान ९ वर श्री. वेदकांनी असें मत दिलें आहे की वाघीण आपलीं पिल्लें खाऊन टाकते या समजुतींत कांही अर्थ नाही. पण पान ४० वर डॉ. लाड यांच्या मुलाखतींत त्यांनी म्हटलें आहे की प्राणिसंग्रहालयांत अस्वलें आणि तरसें उपजूं शकतात, पण काळजी न घेतली तर माद्या आपलीं मुलें उपजताच मारून टाकीत असतात. तेव्हां ही संवय फक्त तरसांनाच व अस्वलांनाच असते, आणि वाघांना नसते काय? आम्ही असें वाचल्याचें आठवतें की पुष्कळ हिंस्र प्राणी रोगट पिलांना उपजतांच मारतात आणि निरोगी तेवढींच वाढवतात. पान २४ वर लेखकाने म्हटलें आहे, 'खरोखर बैलांच्या या झुंजी अेक वेळ तरी पाहाव्या अशा चुरशीच्या व प्रेक्षणीय होत असतात.' यांतील भाषेचा दोष सोडला तरी कोंबडीं, बैल, रेडे, वगैरे प्राण्यांना सतावून, चिडवून, अेकमेकांशीं झुंजायला लावून आपण गंमत पहात बसणें, हा आमचे मतें रानटीपणा आहे आणि त्या पाहण्याची शिफारस करणें ही अक्षम्य अनीति आहे, क्रौर्याला उत्तेजन

देणें आहे. स्पेनमध्यें बैलांना चिडवून माणसांशीं झुंजायला लावतात आणि यांत तरबेज असलेलीं माणसें त्यांची टक्कर कौशल्यानें चुकवतात. हें कौशल्य पाहण्यास रखें असतें, पण जनावरांचे निष्कारण हाल होतात. या झुंजी पहायला हजारों माणसें जमतात आणि तो कित्येकांचा धंदाच असतो. यूरोपांत मुष्टियुद्ध हाही अेक प्रतिष्ठित धंदा समजतात आणि त्यांत कमाअी पुष्कळच असते, परंतु तोंही रानटीपणाच आहे. त्यांत पुष्कळ माणसें दगावतात किंवा जायबंदी होतात. स्वसंरक्षणाकरतां मुष्टियुद्धाचा उपयोग होणें शक्य आहे, परंतु त्याकरतां आपल्याकडील कुस्ती किंवा जपानांतील 'जुजित्सू' हे प्रकार तितकेच किंवा जास्तच उपयोगी होतील आणि त्यांत क्रौर्य नाही. असे कांही दोष असले तरी पुस्तक मनोरंजक आहे यांत शंका नाही. **र. धों. क.**

२. **कै. राजारामशास्त्री भागवत याचे निवडक लेख.** संपादिका, दुर्गा भागवत. प्रकाशक, अभिनव प्रकाशन, मुंबई–१४. पृ २८५, किंमत रु. ५.

या ग्रंथांतील लेख अितक्या विविध प्रकारचे आहेत की त्या सर्वांचें समालोचन करूं लागल्यास अेक ग्रंथच लिहावा लागेल. शास्त्रीबोवा जरी धार्मिक होते, तरी रूढीलाच धर्म मानणारे नव्हते, यामुळें त्यांवर पुष्कळांचा रोष होअी, परंतु ते रोषाला जुमानणारे नव्हते आणि प्रामाणिक टीकाकारांना मात्र त्यांचें समाधान होअीपर्यंत ते उत्तरें देत असत. अर्थात् मूलगामी मतभेद असेल तेथें गोष्ट वेगळी. आमच्यासारख्या नास्तिकांनी रूढींवर आणि धर्मावरही हल्ला केल्यास नवल नाही, पण शास्त्रीबोवानी अितक्या रूढींवर आणि धर्मासंबंधीं चुकीच्या कल्पनांवर जोराचा हल्ला केला हें स्वतंत्र विचारशक्तीचें द्योतक आहे. त्यांचे समग्र लेख आतां प्रसिद्ध होणें कठिणच, तेव्हां हे निवडक लेख प्रसिद्ध केल्याबद्दल लेखिकेस व प्रकाशकांसही धन्यवाद देणें जरूर आहे. शास्त्रीबोवांजवळ आडपडदा बिलकुल नव्हता. जें वाटेल तें स्पष्ट शब्दांत लिहिण्यास ते नेहमी तयार असत. येथें त्यांच्या कांही लेखांचाच

उल्लेख करतों, परंतु सर्वच लेख वाचनीय आहेत. शिमग्याच्या सणाला सर्व सुधारक शिव्या देत असता, आणि शास्त्रीबोवांना लोक सुधारक समजत असतांही त्यांनी त्या सणाचा पुरस्कार केला आहे आणि तोही समंजसपणें केला आहे. ' न मांसभक्षणे दोषः न मद्ये न च मैथुनें, ' म्हणजे मांस, मद्य, यांचें सेवन करण्यांत किंवा स्त्रीसंग करण्यांत दोष नाहीं, हें त्यांनी शास्त्राधारें सिद्ध केलें आहे. आणि 'आजच्या ब्राह्मणांची समजूत अगदीं उलटी कशी झाली,' हा त्याच विषयावर आणखी अेक लेख लिहिला आहे. कोणाबरोबरही जेवायला त्यांची तयारी असे व अिराण्याकडे चहाबिस्कुटें घेण्याबद्दल त्यांनीं अनेकांकडून शिव्या खाल्ल्या आहेत, हें आज कोणाला खरें देखील वाटणार नाही. कितीही मोठा मनुष्य असला तरी त्याचें म्हणणें चूक वाटल्यास प्रखर टीका करण्यास ते मागेंपुढें पहात नसत. ते बायकांच्या मुंजीचे पुरस्कर्ते होते आणि लग्नमुंजीचे विधि त्यांनी अगदीं शास्त्राधारें सुटसुटीत तयार केले होते आणि शक्य तितके अंमलांतही आणले होते. आज क्षत्रिय अस्तित्वांतच नाहीत, हा ब्राह्मणांचा आग्रह त्यांनी खोडून काढला आणि आजचे मराठे हे क्षत्रियच आहेत असें प्रतिपादन केलें. आम्ही नास्तिक असलों तरीही अशा स्वतंत्र वृत्तीच्या लेखकाबद्दल आम्हालाही आदरच वाटतो, आणि ते केवळ मतें मांडूनच थांबत नव्हते, तर तीं अंमलांत आणण्याचें असामान्य धैर्य त्यांच्यांत होतें. असे लोक अपवादात्मकच असतात आणि कोणाही प्रामाणिक माणसाला त्यांच्याबद्दल आदरच वाटला पाहिजे.

र. धों. क.

३. **आरोग्याच्या आघाडीवर**. प्रकाशक, ज्योत्स्ना मंडळ प्रसिद्धि शाखा, चंदन मॅन्शन, गोखले रोड नॉर्थ, दादर, मुंबई २८. वर्ष २ रें, अंक ७-८, पृ. ३८, किंमत नाही.

चालकांच्या निवेदनावरून असें दिसतें की या आरोग्याविषयक पुस्तिकांचे ८ अंक काढून त्यांच्या प्रत्येकीं ५००० प्रती विनामूल्य वांटण्याचें कार्य संस्थेच्या कार्यकर्त्यांनी सतत गेलीं दोन वर्षें केलें आहे. यापुढें मात्र

वार्षिक वर्गणी ट. ख. सह अेक रुपया ठेवण्यांत येअील. या जोड अंकांत वेगवेगळ्या विषयांवर डाक्तरांचे व अितर तज्ञांचे लेख दिले आहेत. हा उपक्रम स्तुत्य आणि उत्तेजनार्ह आहे. **र. धों. क.**

---

# पत्रव्यवहार

## १

आपल्या नवंबरच्या अंकांत ' अमेरिकेंतील न्याय ' या लेखांत मिसिसिपी येथें दोन गोऱ्या माणसांचें लग्न झालें व नवऱ्याची पणजी शिद्दी होती असें समजल्यावरून त्याला पांच वर्षें कैदेची शिक्षा झाली असें लिहिलें आहे. अमेरिका सुधारलेली असून व तेथें लोकशाही नांदत असतांनाही अशी शिक्षा होऊं शकते, यावरून त्यांचा रानटीपणा अजून गेला नाही असें वाटतें. तरी आपलें मत काय आहे तें लिहावें. आपला **दत्तात्रय शिवराम चिखले.**

उ. अमेरिका या बाबतींत रानटीच आहे आणि शिद्दी लोकांशी अत्यंत अन्यायाने वागत आहे यांत शंका नाही. शिद्दी आणि गोरे लोक यांत विवाह बेकायदा आहे, अितकेंच नव्हे तर अेखाद्या शिद्याने अेखाद्या गोऱ्या स्त्रीशीं तिच्या संमतीने जरी संबंध ठेवला, तरी त्याला शिक्षा होते अितकेंही करून अमेरिकेंतील शिद्दी अमेरिकेचे नागरिक आहेत आणि त्यांना अितरांसारखेच हक्क आहेत, असें अमेरिकेच्या घटनेंत आहे. तथापि शिद्यांना कित्येक भोजनगृहांत प्रवेश मिळत नाही, किंवा मिळालाच तर त्यांना वेगळें बसवतात. त्यांच्या समान हक्कांचा पुरस्कार करणारे पुष्कळ लोक आहेत, पण ते त्यांना मिळत मात्र नाहीत. सं.

## २

१. माझं वय २३ वर्षांचें आहे. गेलीं कांही वर्षें हस्तमैथुनामुळें अिंद्रियांत वक्रता उत्पन्न झाली आहे. माझें नुकतेंच लग्न झालें आहे. वक्रता घाल-

वण्यास उपाय काय? 'व्हॅक्युअम मसाज' फायदेशीर आहे काय? २. स्त्रीशीं मासिक पाळींत समागम केल्यास 'यूरेथ्रा' नांवाचा रोग होतो असें वाचलें. माझ्या पत्नीस त्या दिवसांत तीव्र संभोगेच्छा असते. तरी हा रोग फार भयंकर आहे काय? समागम करूनही ( पिशवी न वापरतां ) हा रोग टाळतां येईल काय? ३. समागमाचे वेळीं अेक विशिष्ट आसन ( पत्रांतील वर्णन येथें गाळलें आहे ) करण्याची माझी अिच्छा आहे, परंतु ही पद्धत तिला कदाचित् पसंत पडणार नाही. तर काय करावें? अशा पद्धतीने गर्भ लवकर राहतो हें खरें काय? ४. सामान्यतः रेतस्खलनाला किती काळ लागतो व जास्त वेळपर्यंत स्तंभन करण्यास काय उपाय करावा? ५. ( कांही भाग गाळला आहे ). संभोगानंतर श्वसन कांही वेळ जोराने चालतें व हृदयाचे ठोके जलद पडतात, याचें कारण काय? असें होणें वाअीट आहे काय? ६. आपण मागें अेकदां लिहिलें होतें की कोणतेंही चित्र अश्लील नाही. पण गुह्य भागावरचे केंस दिसतील असें चित्र छापण्यास आपण नकार दिला. असें चित्र आपणास जास्त अश्लील वाटतें काय? आपण म्हणतां असें चित्र छापूं नये असा संकेत आहे. अशा संकेतामागें जर अश्लीलतेचें कारण गर्भित नसेल, तर तें छापण्याची आपली तयारी कां नसावी? आपला...

उ. १. वक्रता घालवण्यास उपाय नाही. 'व्हॅक्युअम मसाज'चा कोणताही उपयोग होत नाही असें अनुभवी लोक सांगतात. २. आपण फारसें काळजीपूर्वक वाचीत नाही असें दिसतें. 'यूरेथ्रा' या शब्दाचा अर्थ मूत्रमार्ग असा आहे, हें रोगाचें नांव नाही. स्त्री जर निरोगी असेल तर मासिक पाळीचे वेळीं समागम करण्यांत कोणताही धोका नाही असें तज्ज्ञांचें मत आहे. ३. तिला पसंत आहे की नाही हें विचारावें आणि नसेल तर करूं नये. अशा पद्धतीने गर्भ राहण्याचा संभव वाढत नाही, तर उलट कमी होतो. ( 'आधुनिक कामशास्त्र' हें पुस्तक पहा ). ४. याचें नक्की उत्तर देणें शक्य नाही, कारण निरोगी माणसांत देखील पुष्कळ फरक दिसतो. दोन

ते पंधरा मिनिटें लागतात अितकेंच सांगतां येअील. स्तंभन यापेक्षां लांबवण्यास उपाय नाही व तसा प्रयत्न करणें हितावह नाही. ५. कोणत्याही कारणानें जलद व्यायाम झाल्यास अशीच स्थिति होते व त्यांत वाअीट असें कांही नाही. ६. कोणतेंही चित्र अश्लील नाही, हें आमचें वैयक्तिक मत आहे. जो संकेत सांगितला, तो चित्रकारांचा आहे व असें चित्र छापल्यास अश्लीलतेच्या कायद्याखालीं शिक्षा होण्याचा संभव आहे. शरीराचे कोणतेही भाग आमच्या मतें अश्लील समजण्याचें कारण नाही. कायद्यानें शिक्षा करावी कीं नाही हें मॅजिस्ट्रेटाच्या मतावर अवलंबतें, कारण अश्लीलतेची व्याख्या कोणालाही करतां आलेली नाही. मॅजिस्ट्रेटाच्या मताप्रमाणें जरी शिक्षा करतां आली, तरीदेखील त्याचें मत बरोबर समजण्याचें कारण नाही, कायद्यानें तसा अधिकार त्याला दिला आहे अितकाच त्याचा अर्थ आहे. 'कायदा गाढव आहे' अशी अिंग्रजींत म्हण आहे. तो कोणालाही कदाचित् लाथ मारील, पण ती लाथ हा चुकीचा पुरावा नाही. अर्थात् शिक्षा करून घेण्याची आमची अिच्छा नाही सं.

३

माझें वय २६ वर्षांचें आहे. मी अविवाहित आहें. गेलीं ९ वर्षें मला हस्तमैथुनाची संवय जडली आहे, पण मीं तें दररोज कधींच केलें नाही. पहिलें वर्ष दोन वर्षें अेक, दोन, तीन, दिवसांआड व नंतर दोन तीन वर्षें आठवड्यातून अेकदां केलें. यामुळें अिंद्रियांत थोडी वक्रता व मार्दव आलें आहे. हस्तमैथुन न केल्यास साधारणतः १५–२० दिवसांनी स्वप्नावस्था होते. पण संपूर्ण संभोगाचें स्वप्न कधींही पडत नाही. माझी प्रकृति चांगली आहे, उंची पांच फूट सहा इंच आहे, गाल लाल असून अंगावर चार बोटें दाबलीं तर रक्ताचे वळ उठतात. साधारणपणें माझा चेहरा मलूल दिसत नाही, उलट मी प्रकृतीनें दांडगा आहें असेंच म्हटलें जातें. मला झोप चांगली पडते. वाचनाचा हौस आहे, यामुळें या संवयीवर माझा जास्त विचार होत नाही. तथापि आतां माझें लग्नाचें वय झालें आहे. मुली सांगून येतात, पण लग्न केलें

तर पत्नीला मी सुख देऊं शकेन की नाही, वीर्यपतन लवकर होओील की काय, लग्न करून मुलीला बुडवल्याचें पातक माथीं येईल की काय, असे प्रश्न उभे राहतात. मी कधी वेश्येकडे गेलों नसल्यामुळें याबाबत काय होओील तें कळत नाही. पण वेश्येकडे जावेसेंही वाटत नाही. आतां गेले दोन महिने मी संवय सोडून दिली आहे. आणखी दोन वर्षें जर सोडून दिली तर मी लग्नास योग्य होईन का ? मी पूर्वीपासून थोडाथोडा व्यायाम घेतों, अलीकडे योगासनें करतों. त्यामुळें पचनशक्ति वाढली आहे. यापासून कांही फायदा होओील का ? याबाबत मार्गदर्शन कराल तर आभारी होओीन. आपला **क.**

उ. आपण अतिरेक केलेला दिसत नाही. याची सविस्तर चर्चा ‘ क्लैब्याची मीमांसा ’ या पुस्तकांत केलेली आहे. यावर स्वतः करण्यासारखे उपाय नाहीत. पुस्तकांत जे उपाय सांगितले आहेत, ते डाक्तरांनाच करतां येतील. योगासनांनी प्रकृतीला फायदा होतो, ते चालू ठेवावे. प्रत्यक्ष स्त्रीशीं गांठ पडल्यावर काय होओील, हें अनुभवाशिवाय समजत नाही, आणि अमुक मनुष्य आपल्या पत्नीला सुख देऊं शकेल की नाही, हें आगाऊ कधींच सांगतां येत नाही, कारण तें कांही अंशीं पत्नीवरही अवलंबून असतें. तथापि ज्यांनी हस्तमैथुनाचा अतिरेक केलेला नाही, त्यांच्यावर कायमचा परिणाम रहात नाही, असा सामान्य अनुभव आहे. यापेक्षां निश्चित असें कांही सांगतां येत नाही. **सं.**

४

( अिंग्रजीचा सरांश ) १. माझ्या अेका स्नेह्याला आपला सल्ला पाहिजे आहे, परंतु आपल्याला लिहिण्याचें त्याला धाडस होत नाही. मी त्याच्या वतीने लिहितों आहे. त्याला कृत्रिम पुरुषी अिंद्रिय पाहिजे आहे. अशीं रबराचीं अिंद्रियें मिळतात असें त्यानें अैकलें आहे. आपण या विषयांतील तज्ञ असल्यामुळें आपण अशा वस्तु विकीत असण्याचा संभव आहे. २. माझ्या मित्राचा उद्देश मोठा चमत्कारिक आहे. त्याचें लक्ष अध्यात्माकडे वेधलें आहे आणि आध्यात्मिक दृष्टीने संस्कृतमधें ज्याला ओजस् म्हणतात, त्याचेंच

शारीरिक रूप रेत हें आहे असें मानतात, तेव्हां मनुष्याला पूर्णपणें आध्यात्मिक व्हायचें असेल, तर त्याकरतां रेताचें रक्षण करणें जरूर आहे. त्याचें उदात्तीकरण आध्यात्मिक शक्तींत होतें, असा समज आहे. पण त्याच्या पत्नीला हें मत मान्य नाही, तिला आपल्या कामवासनेचें आपल्या पतीने वेळोवेळीं शमन करावें असें वाटतें. या दोन्ही गोष्टी साधण्याकरतां त्याला हें कृत्रिम साधन पाहिजे आहे. त्याचा उपयोग केल्याने त्याला पत्नीचेंही समाधान करतां येईल आणि रेताचें रक्षणही करतां येईल. शिवाय असें केल्यानें त्याने कामवासनेवर पूर्णपणें विजय मिळविला आहे की नाही, याचीही कसोटी होईल. ३. ही युक्ति कदाचित् अजून कोणाला सुचली नसेल आणि आपण आत्मा मानीत नसल्यामुळें त्याच्याविषयीं आपणास सहानुभूतिही वाटणार नाही. पण मला ती वाटते, तेव्हां त्याची ही युक्ति कितपत सफल होते हें मला पहायचें आहे. तेव्हां आपण कृत्रिम इंद्रिय कृपा करून ताबडतोब रजिस्टर पोस्टानें पाठवून द्यावें किंवा आपणाकडे तें विक्रीस नसल्यास तें कोठें मिळेल तो पत्ता द्यावा. ४. आपल्या मासिकाचा वर्गणीदार होण्याची इच्छा आहे. नमुन्याकरतां एक प्रत पाठवावी, म्हणजे तें हल्ली कसें काय आहे हें समजेल आणि मग मी वर्गणी भरायची की नाही तें ठरवीन. आपला......

उ. १. अशा वस्तु आमचेकडे नाहीत. २. हा सगळा आचरटपणा आहे, पण अध्यात्मवाले लोक आचरटच असतात, तेव्हां जास्त लिहिण्याचें कारण नाही. अशा उपायांनी पत्नीचें समाधान होईल की नाही हें अनुभवाशिवाय समजणार नाही. ३. ही वस्तु आमचेकडे नसल्यामुळें पाठवतां येणार नाही. हें कोणी उघडपणें विकीत असेल असें वाटत नाही आणि चोरून कोणी विकीत असल्यास माहीत नाही, तेव्हां पत्ता देतां येत नाही. ४. नमुन्याकरतां एक प्रत पाठवली आहे. सं.

---

# शारदेचें पत्र

द्विभार्याप्रतिबंधक कायदा हिंदूंपुरता करणें घटनाबाह्य आहे, असें म्हणणारे न्यायाधीश शेवटीं निघाले. अर्थात् मुंबअी सरकारने हा कायदा केला तेव्हां घटना मंजूर झाली नव्हती, पण आतां तरी फक्त हिंदूंकरतां असा कोणताही कायदा घटनाबाह्य आहे, आणि यामुळें हिंदू कोड बिल मांडतांच येणार नाही, हें आंबेडकरांसारख्या कायदेपंडिताला कळूं नये हें आश्चर्य आहे. पण या कायद्याखालीं मिरजच्या सात लोकांना झालेली शिक्षा सेशन जज्जानें रद्द केली आणि ज्यांनी अपील केलें नव्हतें अशा तीन आरोपींची शिक्षा रद्द करावी, अशी शिफारस हायकोर्टाला केली आहे हें काय थोडें झालें?

मध्यप्रदेशाचे मंत्री संभाजीराव गोखले यांचा वाढलेला रक्तदाब नीरेच्या सेवनाने उतरला अशी बातमी आली आहे, पण ती खरी आहे की केवळ सरकारी प्रचार आहे, हें समजत नाही. सरकारने विकृत केलेल्या नीरेनें कित्येक लोक मेलेही आहेत हें माझ्या लक्षांत आहे, पण कदाचित् ही नागपूरची नीरा सरकारी नसेल. सरकारी नीरा अितकी बेचव असते की ती अेकदां प्याल्यावर पुन्हा प्यावीशी वाटणार नाही.

स. का. पाटलांनी परवां अध्यक्षपदावरून स्वतःचें जें प्रदर्शन केलें, तें अपूर्व होतें यांत शंका नाही. त्यांनी संयुक्त महाराष्ट्राचा ठराव नियमबाह्य ठरवला नाही, पण तो मांडूं मात्र दिला नाही. असें करण्याचा अधिकार अध्यक्षांना पोंचत नाही, मग लोकांनी हें अैकून कसें घेतलें? शिवाय पाटलांनी जें कारण सांगितलें तेंही अजब आहे. पूर्वी अेखादा सरकारी नोकर अध्यक्ष असला आणि सरकारला पसंत नसलेला अेखादा ठराव यायचा असला, तर तो तेवढ्यापुरतें अध्यक्षस्थान सोडीत असे, आणि त्यांत कांही चूक नव्हती. पाटील ज्यांच्यामुळें मोठे झाले, त्यांना खुष ठेवणें त्यांच्या फायद्याचें आहे हें कोणालाही दिसतें, पण 'त्यांत माझे हितसंबंध गुंतले असल्यामुळें मी हा ठराव मांडूं देत नाही,' असें त्यांनी सभेंत उघडपणें सांगावें आणि लोकांनी

तें मुकाट्याने अैकून घ्यावें, ही शरमेची गोष्ट आहे. महाराष्ट्रीयांची वृत्ति अितकी दीन झाल्यावर त्याचें म्हणणें कोण अैकेल आणि संयुक्त महाराष्ट्र कसा मिळेल? स. का. पाटील देखील अेका काळीं संयुक्त महाराष्ट्राला अनुकूल असल्याच्या गप्पा मारीत होते, पण मालकांच्या विरुद्ध जाण्याचें नीतिधैर्य त्यांना होणार नाही, हें भाकीत वास्तविक कोणालाही करतां आलें असतें. अशा स्थितींत अशा माणसाला कोठेही अध्यक्ष करण्याअितकी त्याची लायकी नाही, हें लोकांना कळलें पाहिजे. अध्यक्षांचा अितका का दुष्काळ पडला आहे, की पाटलांना बोलावल्याशिवाय भागतच नाही?

दारूबंदीविरुद्ध तीस अेक डाक्तरांच्या सह्यांनिशीं अेक पत्र टाअिम्स-मधें प्रसिद्ध झालें, पण आमच्या मंत्र्यांना डाक्तरांच्या मताची काय किंमत आहे? शिवाय त्यांच्यासारखें मत देणारे काही डाक्तर त्यांच्या बगलेंत आहेतच. कांग्रेसवाले निर्लज्जपणें सांगतात की बहुसंख्य लोकांचा आम्हाला पाठिंबा आहे. म्हणूनच दर आठवड्याला शेंकडों लोकांना या कायद्याखाली पोलिसाला पकडून आणावे लागतात! या थापा आम्हाला कळतात आणि जरी बहुसंख्य लोक त्यांच्या बाजूला असते, तरीदेखील अल्पसंख्यांकां-वर जुलूम करण्याचा हक्क त्यांना पोंचत नाही. डाक्तरांपेक्षां आम्हाला मद्याचे दुष्परिणाम जास्त कळतात, हें मंत्र्यांचें म्हणणें हास्यास्पद आहे. समाजाशीं कोणाचा निकट संबंध येत असेल तर तो डाक्तरांचा. मद्याचे दुष्परिणाम होत असतील, तर ते डाक्तरांनाच जास्त दिसण्याचा संभव. मजूर जास्त दारू कां पितात? परिस्थितीमुळें त्यांना जास्त दारू प्यावीशी वाटते, आणि ती सुधारल्याशिवाय हें व्यसन सुटणार नाही, असें बर्नार्ड शॉने लिहिलें आहे. मद्याचा अतिरेक करणारांचें प्रमाण अेकंदर समाजांत शेंकडा अेक देखील नाही. त्यांच्याकरतां बाकीच्या ९९ चें नुकसान करायचें, हा जुलूम नाही असें कांग्रेसवाल्यांशिवाय कोण म्हणेल? यांत आणखी अेक मोठी भीति आहे ती अशी कीं उद्यां कांग्रेस सरकार जाऊन दुसरा अेखादा पक्ष अधिकारावर आला, तरी त्यांना हा कायदा रद्द करण्याचें धैर्य होअील की

नाही कोणाला ठाऊक ? हा जुलूम नीतीच्या नांवावर होत आहे, तेव्हां तो बंद करणें म्हणजे अनीति, असें कांही लोक तरी म्हणणारच. या आरोपाला तोंड देण्याचें धैर्य पाहिजे, तरच हा कायदा रद्द होण्याचा संभव. समाजवादी लोक अधिकारावर आल्यावर त्यांना तरी हें धैर्य होईल का ? मला तर तें कठिण दिसतें. अेकंदरींत स्वातंत्र्य देखील दुर्दैवांत भर घालीत आहे. असल्या नीतिबाजांपासून आमचें रक्षण कोण करणार ?

या नीतिबाजीचा आणखी अेक नमुना म्हणजे मुरारजींचें संततिनियमनावरचें वक्तव्य. अर्थात् गांधीछाप ब्रह्मचर्याच्या गप्पा ते आधींपासूनच मारीत होते, पण आतां केवळ तेवढ्यावरच विसंबून न राहतां ते दुसरा अेक उपाय सांगूं लागले आहेत, तो असा की महिन्यांतून कांही दिवस वर्ज्य केले म्हणजे संततिनियमन होतें, मग कृत्रिम साधनें कशाला वापरावीं ? अर्थात् ही थप आहे, पण ती मुरारजींनी आपल्या डोक्यांतून काढलेली नाही. ही दोघां डाक्तरांनी मारलेली थाप आहे आणि तिला आधार अितकाच की महिन्यांतून कांही दिवस गर्भ राहण्याचा संभव जास्त असतो, कांही दिवस कमी असतो. परंतु सर्वस्वी सुरक्षित असे दिवस मुळींच नसतात, अेवढें मात्र त्या डाक्तरांनी लपवून ठेवलें होतें. ही थाप मुरारजींसारख्या धार्मिक लोकांना फसवण्याकरतांच दिलेली होती आणि त्यांनी ती खरी मानून लोकांच्या तोंडावर फेकली. हें अज्ञानाच प्रदर्शन केलें नसतें तरी कांही बिघडलें नसतें, पण त्यांना सर्वज्ञतेची घमेंड आहे ! अशा मंत्र्यापासून सावध रहा, असें म्हणायची आतां वेळ आली आहे. यांच्या उपदेशावरून नीरा प्यालेले कांही लोक मेले आणि कोणाला जुलाब झाले अशी तक्रार नुकतीच टाअिम्समध्यें आली होती. सरकारी विकृत नीरेबद्दलच या तक्रारी आहेत, तेव्हां सरकारचा उपदेश अैकणें धोक्याचें आहे असेंच नव्हे का ?

हिंदुस्थान अन्नाच्या बाबतींत स्वयंपूर्ण होणार असल्याच्या गप्पा मारतां मारतां मुंबअीसरकारला धान्यवांटपांत पंचवीस टक्के कपात करण्याची वेळ

आली. आणि याचें कारण वरच्या अधिकाऱ्यांना आपआपल्या प्रांतांपुरतीच काळजी वाटते असें दिसतें. अरवी अेकाच प्रांतापुरती कपात काय म्हणून? आतां तक्रारींमुळे ती सर्व प्रांतांना लागू केली आहे. आठवड्यांतून अेक दिवस उपास करा, अेवढें सांगून भागलें नाही आणि सरकारजवळ दारूबंदीमुळें पैसे नाहीत, म्हणून आतां दोन दिवस उपास करण्याची पाळी आली आहे. आम्ही उपाशीं मरूं, पण दारूसारखीं व्यसनें चालूं देणार नाही, अशा घमेंडींत आमचे मंत्री आहेत. अर्थात् मंत्री कधींच उपाशीं मरणें शक्य नाही, अितरांचें वाटेल तें होओीना, त्यांना काय पर्वा? हें स्वराज्य आणि स्वातंत्र्य!

मध्यप्रदेश सरकारने दारूबंदीच्या परिणामांचा हिशोब करण्याकरतां अेक बिनसरकारी समिति नेमली आहे, ती काय निकाल देते तें दिसेलच, पण आमच्या मुंबअीसरकारने अेक सरकारी समिति त्याच कामाकरतां नेमली आहे, ती कशाकरतां? तिचा अहवाल मला घरबसल्या लिहितां येईल. दारूबंदी अत्यंत यशस्वी झाली, आतां फारसें कोणी दारू पीतच नाही, तरीपण कांही लोक दमणला जाऊन दारू पिऊन येतात, त्यांना कशी शिक्षा करावी याचा विचार सरकार करीत आहे आणि रेल्वे खात्याने जरी दमणला गाड्या न थांबवण्याची सरकारी विनंति फेटाळून लावली, तरी आम्ही कांहीतरी युक्ति काढूंच, असा त्याचा सारांश असणार, दुसरें काय?

प्रो. क्षीरसागरांनी बडोद्याला हल्लीच्या लेखकांवर जी टीका केली आहे ती ठीकच आहे, पण त्यांनी 'श्रीमती' या शब्दाला जी हरकत घेतली आहे, ती मात्र मला कबूल नाही. ते स्वतःच म्हणतात की 'गंगाभागीरथी' या शब्दाने विधवांच्या वपनाची आठवण होते (ती कशी हें मला माहीत नाही), म्हणून तो शब्द रद्द करून न्यायमूर्ति रानड्यांनी विधवांच्या नांवांमागें 'श्रीमती' हा शब्द लावायला सुरवात केली, पण आतां तो शब्द सरसकट सर्वच स्त्रियांना लावूं लागल्यामुळें आज विवाहित स्त्रियांच्या सौभाग्यावर घाला आला आहे. त्यानी हा विचार केलेला दिसत नाही, की रानड्यांनी जो फरक केला तो योग्य होता का? श्रीमती या शब्दांत वैध-

ण्याचें निदर्शक असें कांही आहे का? अर्थातच नाही, आणि म्हणूनच 'श्रीमती सौभाग्यवती' अशीं दोन्ही विशेषणें विवाहित स्त्रियांना अेकदम लावतात. तेव्हां क्षीरसागरांचें म्हणणें अितकेंच दिसतें की 'श्रीमती' या शब्दाला अेक विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे (तो सुद्धां हा शब्द अेकटा असेल तेव्हां), तेव्हां आतां तो विवाहित स्त्रियांना लावूं नये. पण मी म्हणतें अमुक स्त्री विवाहित आहे की नाही, किंवा विधवा आहे, हें अशा विशेषणांनीं लोकांना कळवणें अगदीं जरूरच आहे का? पुरुषांना जसा सरसकट श्रीयुत हा शब्द हल्ली लावतात, तसाच सर्व स्त्रियांना श्रीमती कां म्हणूं नये?

स्त्रियांच्या बाबतींत जर असा भेद करायचा असेल, तर पुरुषांच्या बाबतींत कां करूं नये? अिंग्रजींत पुरुषांना अेकच 'मिस्टर' शब्द लावतात पण स्त्रियांना मात्र विवाहित किंवा अविवाहित असतील त्याप्रमाणें दोन वेगळे शब्द लावतात. त्यांना विधवांकरतां वेगळा शब्द नाही, पण दोन तरी वेगळे शब्द कां असावे? शिवाय श्रीमती हा शब्द सरसकट लावण्यांत आणखी अेक सोय आहे की पुष्कळ वेळां अमुक स्त्री विवाहित, अविवाहित किंवा विधवा आहे, हें आपल्याला माहीत नसतें आणि तिच्याविषयीं लिहिण्याची वेळ येते. अशा वेळीं काय लिहावें? मला अेखादे वेळीं अशीं पत्रें येतात की खाली फक्त बाअीचें 'अमुकबाअी तमुक' असें नांव असतें. (स्वतःच्या नांवाला बाअी हें सन्मानार्थी शेंपूट जोडणें देखील चूकच आहे, पण तें पुष्कळ बायका लिहितात) अशा वेळीं उत्तर लिहितांना पत्ता कसा लिहावा अशी पंचाअीत पडते. अशा वेळीं श्रीमती हा शब्द सरसकट वापरल्याने अडचण नाहीशी होते. पुरुषांसंबंधी लिहितांना जर त्याचा विवाह झाला आहे की नाही, बायको जिवंत आहे की नाही, याचा विचार कोणी करीत नाही, तर बायकांबद्दलच कां करावा? तें कांही नाही, मला श्रीमती हा शब्द सरसकट लावण्याची पद्धत फार उत्तम वाटते.

तुझी **शारदा**

---

**मासिकास मदत**–एका वाचकाकडून रु. २५ आले आहेत.

**समाजस्वास्थ्य** मासिक दर १४ तारखेला टपालांत पडतें. वर्गणी रु. ३, व्ही. पी. ने सवातीन.

# आमचेकडे मिळणारा माल

**लॅम्बट डच कॅप,** रु. ७. **उभट टोपी,** रु. २. **राइट कॉंट्रॅसेप्टिव्ह जेली,** रु. ३॥. **गायनोमिन टॅब्लेट्स्** ( संततिनियमनाकरतां ) डझनाचे नळीस रु. २॥. **पिशव्या,** ४ आणे, ८ आणे, रु. १।. **भोंवऱ्याची पिचकारी,** रु. ७.

**ल्यूटीज फार्मोकल कं.** चीं हेमिओपॅथिक व इतर औषधें ( अमेरिकन ):—

**क्रमांक १४** ( संधिवात, सायॅटिका, कटिवात वगैरे ) रु. २–१२.

,, **२५९** ( फाजील रक्तदाब ) रु. २–१२

**राइट एजन्सी** १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई ४.

इंग्रजीचें चांगलें ज्ञान असलेली, स्वतंत्रपणें कचेरीचें काम करूं शकणारी, **सोवतीण पाहिजे.** फोटोसह लिहा. G C/o **समाजस्वास्थ्य**

Registered No. B 2289.


## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. क्लैब्याची मीमांसा, किंमत रु. ६, ट. ख. ७ आणे
२. आधुनिक आहारशास्त्र, किं. १॥ रु., ट. ख. ६ आणे
३. आधुनिक कामशास्त्र [ सचित्र ], ५ वी आवृत्ति किंमत रु. ४, ट. ख. ७ आणे.
४. संततिनियमन [सचित्र], १० वी आ. १। रु. ट. ख. ५ आ.
५. गुप्त रोगांपासून बचाव, ४ थी आ. रु. १, ट. ख. ५ आणे.
६. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील निवडक लेख,
भाग १ ला [ पहिली तीन वर्षे ], खलास आहे.
भाग २ रा [ वर्षे ४–५–६ ], किं. २–०–०, ट. ख. ६ आ.
७. त्वचेची निगा, किं. ८ आ., ट. ख. ५ आ.
८. गुरुबाजी ( नाटक ), किं. ८ आ., ट. ख. ५ आणे
९. वेश्याव्यवसाय, किं. २ रु., ट. ख. ६ आ.
१०. तेरा गोष्टी, किं. १ रु. ट. ख. ५ आ.
११. न्यायाचा शोध (नाटक), किं १ रु., ट. ख. ५ आ.

### डॉ. के. भा. लेलेकृत

१. बाहेरख्यालीचे दुष्परिणाम, २ री आ., किं. ५ आ.
२. मूळव्याध, किं. ४ आ.

### श्री. रमा बखले कृत

फुटपाथचें गाऱ्हाणें, किं. ८ आणे, ट. ख. ५ आणे.

राइट एजन्सी, नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, मुंबई नं. ४.


मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रेस, (मुंबई) लिमिटेड, ३५, ताडदेव रोड, मुंबई–७

मुद्रक व प्रकाशकः—रघुनाथ धोंडो कर्वे, राइट एजन्सी,
नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, गिरगांव, मुंबई–४